# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः19.04.2026** **वारः रविवार**

---

**ठळक बातम्या,**

- **महिला आरक्षणाचं विधेयक मंजूर न झाल्याबद्दल पंतप्रधान मोदींकडून खेद व्यक्त; या विधेयकाला विरोध करणाऱ्या विरोधी पक्षांवर जोरदार टीका**
- **कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांच्याकडून खरीप हंगामाच्या तयारीचा आढावा**
- **'चार धाम यात्रा' आजपासून सुरू होणार.**
- **दक्षिण कोरियाचे राष्ट्राध्यक्ष ली जे म्युंग आज भारत भेटीवर**
- **आणि**
- **होर्मुझची सामुद्रधुनी सर्व व्यापारी जहाजांसाठी बंद करण्याची इराणची घोषणा**

**आता सविस्तर बातम्या,**

**पीएम संबोधन**

देश हित आपल्या सरकारसाठी सर्वात महत्वाचं असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल सांगितलं. महिला आरक्षणासंबंधीचं विधेयक संसदेत मंजूर होऊ शकलं नाही; त्यानंतर काल पंतप्रधानांनी देशवासीयांना संबोधित केलं. सरकारनं अत्यंत कळकळीनं आणि प्रामाणिकपणे प्रयत्न करूनही नारी शक्ती वंदन अधिनियमात दुरुस्तीचा मार्ग मोकळा करू शकलो नाही याबद्दल त्यांनी देशातील माता भगिनींची माफीही मागितली.

**बाईट – मोदी १ – क्षमा**

जेव्हा काही लोकांसाठी केवळ त्यांचा पक्षच अन्य कशाहीपेक्षा महत्त्वाचा होतो तेव्हा महिला सक्षमीकरण आणि राष्ट्र हिताला त्याचे परिणाम भोगावे लागतात, अशा शब्दात पंतप्रधानांनी काँग्रेससह इतर विरोधी पक्षांवर टीका केली. ते म्हणाले, महिलांच्या हिताचं विधेयक मंजूर होऊ शकलं नाही तेव्हा आपण अतिशय व्यथित झालो असताना महिलांचे हक्कहिरावून घेऊन, काँग्रेस, द्रमुक, समाजवादी पार्टी, आणि तृणमूल काँग्रेसचे सदस्य टाळ्या आणि बाकं वाजवत होते. त्यांचं हे कृत्य महिलांची प्रतिष्ठा आणि स्वाभिमानाला सुरुंग लावणारं आहे, असंही ते म्हणाले. नारीशक्ती वंदन विधेयकात सुधारणा होणं ही काळाची गरज असून उत्तर, दक्षिण, पूर्व आणि पश्चिम अशा सर्व भागात सक्षमीकरणाचा समतोल साधण्याचा तो प्रयत्न होता, असंही पंतप्रधानांनी नमूद केलं. राज्य मोठे असो वा लहान—प्रत्येक राज्याचं संसदेतलं स्थान,त्यांचं प्रतिनिधित्व योग्य प्रमाणात वाढवून अधिक बळकट करणं हा या विधेयकाचा उद्देश होता;परंतु काँग्रेस आणि त्याच्या मित्रपक्षांनी हा प्रामाणिक प्रयत्न हाणून पाडला,असं पंतप्रधान म्हणाले.

**---बाईट – मोदी २ – स्टेट**

ज्या पक्षांनी नारी शक्ती वंदन सुधारणेला विरोध केला ते महिलांच्या शक्तीला गृहीत धरत आहेत. महिला आरक्षणाला विरोध करण्याच्या पापाची नक्कीच त्यांना शिक्षा मिळेल, असंही मोदी म्हणाले.
दरम्यान संसदेच्या दोन्ही सभागृहाचं कामकाज काल अनिश्चित काळासाठी संस्थगित करण्यात आलं.

**खरीपआढावा**

केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी काल एक उच्चस्तरीय बैठक घेऊन त्यामध्ये देशातील कृषी क्षेत्राची सध्याची स्थिती आणि आगामी खरीप हंगामाच्या तयारीचा आढावा घेतला. या आढावा बैठकीत शेतकऱ्यांच्या हिताच्या मुद्द्यावर सर्वाधिक भर देत त्यांच्या हिताचं रक्षण करण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्याचे कृषी सचिव तसंच अन्य संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांना निर्देश दिले. यंदा मोसमी पावसावर होणाऱ्या संभाव्य एल निन्योच्या परिणामाला तोंड देण्यासाठी पूर्ण तयारीनिशी सज्ज राहावं अशी देखील सूचना त्यांनी बैठकीत केली.

**संरक्षणमंत्री**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी काल नवी दिल्लीत आयोजित मंत्रिगटाच्या एका अनौपचारिक बैठकीदरम्यान,पश्चिम आशियातील सध्याच्या परिस्थितीचा आणि भारताच्या सज्जतेचा आढावा घेतला. या बैठकीला परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर, रसायन आणि खते मंत्री जे.पी.नड्डा, पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंग पुरी, बंदरे, नौवहन आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल आणि इतर केंद्रीय मंत्री उपस्थित होते.
जागतिक पुरवठ्याशी संबंधित आव्हानं असूनही, भारताकडे इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. सध्या देशाकडे कच्च्या तेलाचा, पेट्रोलचा, डिझेलचा आणि विमान इंधनाचा ६० दिवसांहून अधिक काळासाठी पुरेल इतका साठा आहे. एलएनजीचा साठा सुमारे ५० दिवस पुरू शकतो, तर एलपीजीचा साठा साधारणपणे ४० दिवसांसाठी पुरेसा आहे, अशी माहिती या बैठकीत सांगण्यात आली.

**चारधामयात्रा**

उत्तराखंडमध्ये, उत्तरकाशी जिल्ह्यातल्या गंगोत्री आणि यमुनोत्री मंदिरांचे दरवाजे आज उघडले जातील आणि 'चार धाम यात्रा' औपचारिकरित्या सुरू होईल. मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी काल ऋषिकेश इथून या यात्रेसाठीच्या बसेसना हिरवा झेंडा दाखवला. ही तीर्थयात्रा सुरळीत, सुरक्षित आणि सुव्यवस्थितपणे पार पाडणे हे सरकारचे सर्वोच्च प्राधान्य आहे असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. सर्व भाविकांना धार्मिक स्थळी आणि प्रवासाच्या मार्गांवर स्वच्छता राखण्याचं आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केलं.

हे राष्ट्रीय बातमीपत्र आपल्याला पुणे केंद्रावरून देण्यात येत आहे.

**द.कोरिया राष्ट्राध्यक्ष-भारतदौरा**

दक्षिण कोरियाचे राष्ट्राध्यक्ष ली जे म्युंग आज सपत्नीक भारताच्या दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्यासमवेत मंत्री, वरिष्ठ अधिकारी आणि व्यावसायिक नेत्यांचा समावेश असलेलं एक उच्चस्तरीय शिष्टमंडळ असणार आहे. राष्ट्राध्यक्ष ली यांचा हा भारताचा पहिलाच दौरा असून या दौऱ्यात राष्ट्राध्यक्ष ली हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी चर्चा करतील. जहाजबांधणी, व्यापार, गुंतवणूक, कृत्रिम बुद्धिमत्ता,सेमीकंडक्टर्स,उदयोन्मुख तंत्रज्ञानआणि सांस्कृतिक देवाणघेवाण यांसारख्या विविध क्षेत्रांमधील द्विपक्षीय सहकार्य अधिक बळकट करणं हा या चर्चेचा उद्देश

असेल. याशिवाय परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवरही दोन्ही नेते विचारांची देवाणघेवाण करतील. राष्ट्राध्यक्ष ली हे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचीही भेट घेतील. तर परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर हे देखील त्यांची भेट घेतील.

**इराणहोर्मुझ**

जोपर्यंत अमेरिका इराणी बंदरांवरील नाकेबंदी उठवत नाही, तोपर्यंत होर्मुझची सामुद्रधुनी बंद राहील,असं इराणनं म्हटलं आहे. अमेरिकेकडून सुरू असलेल्या नाकेबंदी म्हणजे शस्त्रसंधीचं उल्लंघन असून, सामुद्रधुनीजवळ येणाऱ्या कोणत्याही जहाजाला शत्रू मानलं जाईल आणि त्याला लक्ष्य केलं जाऊ शकते,असा इशारा इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्सनं दिला आहे.

दरम्यान की, जोपर्यंत इराणसोबतचे सर्व मुद्दे पूर्णपणे सुटत नाहीत, तोपर्यंत नौदल नाकेबंदी लागू राहील,असं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. सामुद्रधुनीमध्ये गोळीबाराच्या घटना आणि व्यापारी जहाजांचे नुकसान झाल्याच्या वृत्तांमुळे परिस्थिती आणखी चिघळली आहे.

**तामिळनाडू निवडणूक प्रचार**

तामिळनाडू विधानसभा निवडणुकीचा प्रचार २१ एप्रिलला संपणार असल्यानं निवडणूक प्रचार शिगेला पोहोचला आहे. सर्वच राजकीय पक्षांचे दिग्गज नेते प्रचाराच्या अंतिम टप्प्यासाठी राज्यात दाखल होत आहेत. आज, केंद्रीय गृहमंत्री आणि भाजप नेते अमित शाह हे 'एनडीए' (NDA) उमेदवारांच्या समर्थनार्थ इरोड जिल्ह्यातल्या शिवगिरी इथं प्रचार करणार आहेत. याआधी पंतप्रधान आणि भाजप नेते नरेंद्र मोदी यांनीही राज्याचा दौरा केला होता. तर दुसरीकडे, विरोधी पक्षातर्फे काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी राज्याच्या उत्तरेकडील जिल्ह्यांमध्ये प्रचार केला. राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी यादव हे देखील प्रचारात सहभागी झाले असून, त्यांनी 'सेक्युलर प्रोग्रेसिव्ह अलायन्स'च्या समर्थनार्थ कोईम्बतूर, तिरुपूर आणि निलगिरी या भागांमध्ये प्रचार केला. दरम्यान, कनिमोझी यांनी वृद्धाचलम इथं प्रेमलता विजयकांत यांच्यासाठी प्रचार केला.

**पश्चिम बंगाल निवडणूक प्रचार**

भाजपचे ज्येष्ठ नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी हे आज पश्चिम बंगालमधील बांकुरा, पुरुलिया,झाडग्राम आणि इतर जिल्ह्यांमध्ये पक्षाच्या उमेदवारांच्या समर्थनार्थ विविध ठिकाणी जाहीर सभा घेणार आहेत. भाजप नेते आणि केंद्रीय मंत्री जे.पी. नड्डा हे देखील आज कूचबिहार आणि जलपाईगुडी जिल्ह्यांमधील रॅलींमध्ये सहभागी होतील. तर भाजपचे अध्यक्ष नितीन नवीन हे आज दक्षिण दिनाजपूर जिल्ह्यातल्या बालूरघाट शहरात जाहीर सभा घेतील आणि त्यानंतर माल्दा इथं रोड शो करतील.

**क्रिकेट**

भारत आणि दक्षिण आफ्रिकेच्या महिला क्रिकेट संघादरम्यान दूसरा टी ट्वेंटी सामना आज डर्बन इथल्या किंग्समीड स्टेडियमवर होणार आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार संध्याकाळी साडे पाच वाजता हा सामना सुरू होईल. पाच सामन्यांच्या या मालिकेतल्या पहिल्या सामन्यात, भारताला पराभवाला सामोरं जावं लागलं होतं.

**नेमबाजी**

इजिप्तमधल्या कैरो इथं आजपासून कनिष्ठ गटाची विश्वचषक नेमबाजी स्पर्धा सुरू होत आहे. भारतीय नेमबाज शिवा नरवाल आणि सबीरा हारिस यांच्या नेतृत्वाखालील ७१ सदस्यीय संघ या स्पर्धेत सहभागी होत आहे. भारत

या स्पर्धेतल्या १८ पदकांच्या स्पर्धांमध्ये सहभागी होईल, २१ वर्षांखालील नेमबाजांसाठी आयोजित, ही स्पर्धा या २७ एप्रिलपर्यंत चालणार आहे.

**शेवटी पुन्हा ठळक बातम्या,**

- **महिला आरक्षणाचं विधेयक मंजूर न झाल्याबद्दल पंतप्रधान मोदींकडून खेद व्यक्त; या विधेयकाला विरोध करणाऱ्या विरोधी पक्षांवर जोरदार टीका**
- **कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांच्याकडून खरीप हंगामाच्या तयारीचा आढावा**
- **'चार धाम यात्रा' आजपासून सुरू होणार.**
- **दक्षिण कोरियाचे राष्ट्राध्यक्ष ली जे म्युंग आज भारत भेटीवर**
- **आणि**
- **होर्मुझची सामुद्रधुनी सर्व व्यापारी जहाजांसाठी बंद करण्याची इराणची घोषणा**

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं

# नमस्कार.